आरोग्य विभाग, जिल्हा परीषद, कोल्हापूर
जिल्हा प्रशिक्षण केंद्र, कोल्हापूर.
पत्ता सोमेश्वर गल्ली, शुक्रवार पेठ, कोल्हापूर.
फोन नं. ०२३१ २५४४८०७ ईमेलmodtt.kop@gmail.com

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

NHM राष्ट्रीय आरोग्य अभियान महाराष्ट्र

जा.क्र./जि.प्र.के./आ.वि. / खाजगी वाहन ऑन कॉल /334/२०२६ दिनांक 2/१२/२०२६

विषय :- जिल्हा प्रशिक्षण केंद्र, कोल्हापूर मार्फत सीपीएचसी (CPHC) प्रशिक्षण तसेच प्रशिक्षण मुल्यमापनाकरिता इ. करीता खाजगी वाहन भाड्याने घेणेसाठी दरपत्रके मागणी करीत असलेबाबत.

नोटीस

जिल्हा प्रशिक्षण केंद्र, कोल्हापूर मार्फत सीपीएचसी प्रशिक्षण प्रशिक्षक तसेच प्रशिक्षण साहित्य ने-आण करणे, तसेच ईतर प्रशिक्षण कार्यक्रमासाठी गजेप्रमाणे खाजगी वाहन ऑन कॉल बेसीसवर घेणेत येणार आहे. यासाठी वाहन व्यवस्था करणाऱ्या वाहन पुरवठादार / व्यावसायिक यांच्याकडून खालील दरपत्रके मागविण्यात येत आहे. करीता या नोटीसीद्वारे विहीत नमुन्यात व दोन लिफाफा पध्दतीने दरपत्रके मागविणेत येत असुन हे नोटीस मिळालेपासून आपलेकडुन शिलबंद लखोटयात खालील पत्यावर कार्यालयीन वेळेत समक्ष सात दिवसांच्या आत दिनांक ~~१०/२०२६~~ १२/१२/२०२६ रोजी दु.१२.०० पुर्वी मिळतील असे पाठवावे. मुदतीनंतर आलेले दरपत्रक स्वीकारली जाणार नाहीत.

अंतिम मुदत दि. १२ नोव्हेंबर २०२६ रोजी दु. १२.०० वा पर्यंत

दर भरावयाचा विहित नमुना

प्रति,
मा.वैदयकीय अधिकारी,
जिल्हा प्रशिक्षण केंद्र, कोल्हापूर

विषय -जिल्हा प्रशिक्षण केंद्र, कोल्हापूर मार्फत सीपीएचसी (CPHC) प्रशिक्षण तसेच प्रशिक्षण मुल्यमापनाकरिता इ. करीता खाजगी वाहन भाड्याने घेणेसाठी दरपत्रक सादर करीत असलेबाबत.

संदर्भ - खाजगी वाहन भाडयाने घेणेसाठीची मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. कोल्हापूर यांची मंजुर टिप्पणी दि 2/१२/२०२६

महोदय,

वरील संदर्भिय विषयान्वये, मी/आम्ही खालील वस्तुंचे वाजवी दर देत आहोत.

१) पुरवठादाराचे नाव व पत्ता :-.....
फर्मचे नांव, प्रोप्रायटर व पत्ता.....
.....

२) व्यवसाय परवाना क्रमांक व दिनांकः-.....

३) पॅन कार्ड नं. :-.....

४) जी.एस.टी. प्रमाणपत्र, जीएसटी लागु नसलेस तसा दाखला.

दर भरावयाचा विहित नमुना

अ.क्र.	वाहनाचा प्रकार	आसन क्षमता	Estimate Cost (Per Day) (Including All taxes)	जिल्हा अंतर्गत एक दिवसाचे ३०० किमी मर्यादेत भाडे (Including All taxes)	Estimate Cost (Per K.M.) (Including All Taxes)	दर प्रति कि.मी. (Including All taxes)
१	टोयाटो इनोव्हा क्रिस्टा	०७	४०००		Rs १३/-	
२	टाटा सुमो, बोलेरो इ.	०७	४०००		Rs १३/	
३	स्विप्ट डिझायर/ईटीओस इ.	०५	४०००		Rs १३/	
४	बोलेरो पिकअप व्हॅन इ.	०२	४०००		Rs १३/	
५	मिनी बस	१४	४०००		Rs १३/	

३. अटी व शर्ती व दरपत्रकासोबत सादर करावयाची प्रमाणपत्रे:

१. संपूर्ण दरपत्रक अथवा त्याचा भाग कोणत्याही वेळी कोणतेही कारण न दर्शविता स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार जिल्हा आरोग्य अधिकारी जि.प. कोल्हापूर / सक्षम प्राधिकारी यांनी राखून ठेवलेला आहे.

२. कार्यालयीन वेळेत द्वि लिफाफा पद्धतीने सिलबंद लिफाप्यामध्ये दरपत्रके स्वीकारण्यात येतील .

३. एका स्वतंत्र सिलबंद लिफाप्यामध्ये स्वंय साक्षांकित केलेली वैध प्रमाणपत्रे घालून त्यावर प्रमाणपत्रे (तांत्रिक लिफापा) असे नमूद करावे व दुसऱ्या सिलबंद लिफाप्यामध्ये दरपत्रके घालून त्यावर दरपत्रके असे नमूद करावे. दोन्ही लिफाफे एका मोठ्या लिफाप्यात घालून तो सिलबंद लिफाफा कार्यालयीन वेळेत सादर करावा. टपालाने अथवा कुरियर सेवामार्फत पाठविलेली दरपत्रके विलंबाने प्राप्त झाल्यास ती उघडण्यात येणार नाहीत .

४. व्यावसायिक / संचालकाचे मुंबई दुकाने व संस्था अधिनियम १९४८ अन्वये संस्था/व्यवसाय नोंदणीचे अद्ययावत प्रमाणपत्र .

५. प्रवासी वाहतुकीचा व्यवसाय चालविण्यासाठीचा संबंधित विभागाचा अद्ययावत परवाना .

६. संस्था/फर्मचे GST नोंदणी प्रमाणपत्र . जीएसटी लागू नसेल तर सीएचे प्रमाणपत्र.

७. पॅनकार्डची छायांकित प्रत जोडावे .

८. इच्छुक व्यावसायिक/सेवा केंद्र संचालकाने संस्थेच्या लेटरपॅडवर दरपत्रक सर्व करासह सादर करावे .

९. उपरोक्त बाबी/सेवा तपशिलासह इतर जास्तीच्या सुविधा, सवलती व सेवा पुरवणाऱ्या ज्या व्यावसायिकाचे दरपत्रके न्युनतम दराचे असेल त्यांचेच दरपत्रक मान्य करण्यात येईल .

१०. प्रवासापूर्वी कसल्याही प्रकारे अग्रिम रक्कम अदा करण्यात येणार नाही. प्रवासाकरिता पुरवठा करणाऱ्या वाहनाचे नियमानुसार विमा काढलेला असावा. वाहनाचे आर.सी. बुक, परमिट, फिटनेस, पी.यु.सी. अद्ययावत व वैध असणे बंधनकारक आहे .

११. प्रत्येक वाहनामध्ये किमान रु. ५००/- चे रिचार्ज असलेले फास्टॅग असणे आणि जीपीएस सिस्टीम असणे अनिवार्य आहे .

१२. कार्यालयाकडून दूरध्वनी किंवा पत्राद्वारे मागणी नोंदवल्यानंतर जास्तीत जास्त १ तासाच्या आत आदेशित वाहन केंद्राच्या कार्यालयात उपस्थित होणे बंधनकारक राहील .

१३. वाहनाचे इंधन, वंगण, दुरुस्ती, नियमित देखभाल व चालक यांचा सर्व खर्च पुरवठादाराचा/वाहन मालकाचा राहील .

१४. अधिकारी/कर्मचारी यांचा कार्यक्षेत्रातील दौरा पूर्ण झाल्याशिवाय अथवा सक्षम प्राधिकाऱ्यांच्या परवानगी शिवाय वाहन सोडले जाणार नाही .

१५. चालकाचे अधिकृत वैद्यकीय अधिकाऱ्याकडून मिळालेले वैद्यकीय शारीरिक पात्रता प्रमाणपत्र आणि पोलीस पडताळणी सादर करणे बंधनकारक आहे .

१६. वाहन चालकाकडे चालू स्थितीतील मोबाईल असणे आवश्यक आहे .

१७. योग्यरीत्या स्वाक्षरी केलेले लॉगबुक आणि जीएसटी, टॅक्स इनव्हॉईस सादर केल्यानंतर नियमानुसार कर कपात (टी.डी.एस. व जी.एस.टी.) करून रक्कम अदा केली जाईल .

१८. पुरवठा करण्यात येणारे वाहन चांगल्या स्थितीतील १ जानेवारी २०२० किंवा त्यानंतरचे नवीन व सुसज्ज स्थितीत उत्तम आसन व्यवस्था, स्वच्छ असावे .

१९. वाहनचालकाचा ड्रेस पांढरा शर्ट व पँट पुरवठादाराने पुरवावी (शासकीय ड्रेसकोड). वाहनचालक मितभाषी, नम्र असावा तो धुम्रपान, मद्यपान व कुठल्याही प्रकाराचे व्यसन करणारा नसावा. तसेच उद्धट व्यवहार करीत असल्यास त्याला पुढील प्रवासा ऐवजी परत पाठविण्यात येईल. त्या वाहनाचे झालेल्या प्रवासाचे तेवढे भाडे अदा करण्यात येणार नाही .

२०. प्रवासामध्ये दुर्दैवाने वाहनाचा अपघात, वाहनचालक जखमी/जिवीत हानी झाल्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही. याची सर्व जबाबदारी वाहन पुरवठादार याची राहील .

२१. प्रवास पूर्ण केल्यानंतर कार्यालयीन प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर देयकाची रक्कम PFMS/CMP/ RTGS/ NEFT (Cashless Transaction) पद्धतीनेच अदा करण्यात येईल .

२२. प्रवासामध्ये टोलनाका/पार्किंग शुल्क कंत्राटदाराने भरणा करावी. ती देयकमध्ये धरू नये .

२३. दरपत्रक सादर करण्याची अंतिम मुदत .

२४. दरपत्रके सादर करण्याची मुदत संपल्यानंतर दुसऱ्या कामाच्या दिवशी दुपारी ३.०० वाजता कार्यालयात खरेदी समिती समक्ष दरपत्रके उघडण्यात येतील .

२६. देयकाची अदायगी PFMS/CMP/RTGS/NEFT (Cashless Transaction) पद्धतीनेच करण्यात येणार असल्याने पुरवठादाराने आपल्या लेटरपॅडवर बँक खात्याची सविस्तर माहिती सादर करावी .

२७. उपरोक्त अ.क्र. १ ते २६ अटी व शर्ती मान्य असल्याचे संस्थेच्या लेटरपॅडवर हमीपत्र .

२८. पुरवठादार वाहन पुरवण्यास असमर्थ ठरल्यास, प्रशासनास दुसऱ्या मार्गानी वाहन भाड्याने घेण्याचा अधिकार राहील आणि होणारा अतिरिक्त खर्च मूळ पुरवठादाराच्या देयकातून कपात केला जाईल .

हमीपत्र

मी/आम्ही ..... या हमी पत्राद्वारे लिहून देतो की, दरपत्रक मागविणाऱ्या खरेदी प्राधिकाऱ्या बरोबर कोणत्याही प्रकारे हितसंबंध नसून हित संबंधाबाबत संघर्ष नाही. तसेच खरेदी प्राधिकाऱ्याकडे सादर करण्यात आलेले दरपत्रक हे एकल असून दुसऱ्या कोणत्याही संस्थसोबत संयुक्तरीत्या किंवा संगनमताने साखळी करून दरपत्रक भरलेले नाही. असे आढळून आल्यास नियमानुसार योग्य त्या दंडात्मक कार्यवाहीस पात्र राहील . तसेच मी/आम्ही आज दि. ...../...../२०२६ रोजी हमीपत्र लिहून देतो की, कार्यालय प्रमुख यांनी वाहन भाडेतत्त्वावर पुरवठा करण्यासाठी मागविलेल्या दरपत्रकामधील नमूद केलेल्या अ.क्र. ०१ ते २८ अटी व शर्ती काळजीपूर्वक वाचल्या असून त्या मला/आम्हाला मान्य आहेत. तांत्रिक लिफाप्यामधील प्रमाणपत्रांचे शिथीलतेबाबतचे सर्व अधिकार दरपत्रके निवड समितीनें राखून ठेवलेले आहेत याची जाणीव मला/आम्हाला आहे व ते मला/आम्हाला मान्य आहे .

स्थळ :- .....

दिनांक :- .....

नाव व पत्ता: .....

दरपत्रककर्त्याची सही व शिक्का

जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद, कोल्हापूर.

पत्ता :-
नावे - वैदयकीय अधिकारी,
जिल्हा प्रशिक्षण केंद्र, पिवळा वाडा,
शुक्रवार पेठ, कोल्हापूर. ४१६००२